स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यांच्याशी सलग्नित

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

## इतिहास विभाग

यांना

तृतीय वर्ष कला या पदवी करिता सादर करावयाचा संशोधन प्रकल्प

# "श्री संत मन्मथ स्वामी महाराजांचे साहित्यिक योगदान : एक अभ्यास"


सादरकर्ता

**संतोष माधव इंद्राळे**

विद्यार्थी, तृतीय वर्ष कला

मार्गदर्शक

**लेफ्ट. डॉ. अर्चना धनराज टाक**

सहाय्यक प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख

**डॉ. महादेव गव्हाणे**

प्राचार्य

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त),

लातूर- ४१३५१२.


एप्रिल २०२३

# प्रतिज्ञापत्र

**“श्री. संत मन्मथ स्वामी महाराजांचे साहित्यिक योगदान : एक अभ्यास”** या विषयावरील प्रस्तुत प्रकल्प मी राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर यांच्या तृतीय वर्ष कला या पदवीसाठी लिहिलेला आहे. या प्रकल्पात समाविष्ट करण्यात आलेले कार्य माझ्या स्वतःच्या प्रयत्नांचे फलित आहे. त्यासाठी माझ्या मार्गदर्शकांकडून मिळालेले मार्गदर्शन आणि यापूर्वी झालेल्या संशोधनांचे संदर्भ याशिवाय कशाचीही मदत घेण्यात आली नाही. उपयोगात आणलेल्या संदर्भांचा योग्य निर्देश करण्यात आला आहे. हा प्रकल्प अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही व कोणत्याही परिक्षेसाठी सादर केलेला नाही.

**स्थळ:** लातूर

**दिनांक: ०६/०४/२०२३**

**संतोष माधव इंद्राळे**
विद्यार्थी
तृतीय वर्ष कला
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यांच्याशी सलग्नित

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

## इतिहास विभाग

तृतीय वर्ष कला

२०२२-२३

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, संतोष माधव इंद्राळे यांनी राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर यांच्या तृतीय वर्ष कला या पदवीसाठी सादर केलेल्या "श्री. संत मन्मथ स्वामी महाराजांचे साहित्यिक योगदान : एक अभ्यास" हा संशोधन प्रकल्प माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. प्रकल्प लेखनात ज्या संदर्भ साधनांचा आधार घेण्यात आला आहे. त्याचा यथोचित निर्देश केला आहे. संतोष माधव इंद्राळे यांनी हा प्रकल्प स्वतंत्ररित्या लिहिला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठात, कोणत्याही अन्य परिक्षेसाठी सादर केला नाही. सदरचा प्रकल्प राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष कला (Bachelor of Arts) या पदवीसाठी सादर करण्याची माझी अनुमती आहे.

**Exam Seat No.:** RAS2360026

**स्थळ:** लातूर

**दिनांक:** ०६/०४/२०२३

मार्गदर्शक

**लेफ्ट. डॉ. अर्चना धनराज टाक**
सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख
इतिहास विभाग
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

**डॉ. महादेव गव्हाणे**
प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर
पिन कोड – ४१३५१२

# ऋणनिर्देश...

आयुष्यात अनेक लोक हे आपल्याला भेटत असतात, जेव्हा एखादे चांगले काम करण्यासाठी आपण हातात घेतो, तेव्हा काही लोक ते काम पूर्ण करण्यासाठी सहकार्य करत असतात, तर काही लोक त्या कामात अडचणी कशा निर्माण होतील याची वाट पाहत असतात. परंतु अशा चांगल्या कामात मला साथ देणारे, मला प्रोत्साहन देणारे, मला सहकार्य करणारे अनेकजण आहेत, त्यांचा उल्लेख केल्याशिवाय ह्या प्रकल्प अभ्यासास पुर्णत्व येणार नाही.

कोणतेही कार्य करण्याचे निश्चित केल्यास त्या कार्याचा संकल्प व्यवस्थिपणे पूर्ण होण्यासाठी त्या व्यक्तीला स्वतः प्रयत्न करावे लागतात, परंतु आसपासच्या अन्य व्यक्तींचा मोलाचा सहभाग, सहकार्य असल्याशिवय ते शक्य होत नाही. प्रस्तुत प्रकल्प अभ्यासाचा विषय निश्चित करण्यापासून ते प्रकल्प अभ्यास कार्य पूर्णत्वास नेण्यापर्यंत अनेकांचे अनेक प्रकारे अत्यंत अनमोल सहकार्य लाभले आहे. याठिकाणी त्यांचे आभार मानने उचित ठरेल असे मला वाटते.

ऋषितुल्य व्यक्तिमत्व असलेले शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय डॉ. गोपाळरावजी पाटील साहेब, उपाध्यक्ष आदरणीय डॉ. पी. आर. देशमुख सर, लातूर पॅटर्नचे जनक असलेले संस्थेचे सचिव आदरणीय प्राचार्य अनिरुद्ध जाधव सर, सहसचिव आदरणीय श्री. गोपाळ शिंदे सर, सहसचिव आदरणीय श्री. सुनील सोनवणे सर, सदस्य आदरणीय डॉ. रावसाहेब कावळे सर यांच्या आशीर्वादाचे हात माझ्या डोक्यावर असल्यामुळेच मी हे प्रकल्प लेखन कार्य पूर्ण करू शकलो.

प्रत्येक चांगल्या कामासाठी आम्हां सर्व विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणारे व तितक्याच कर्तव्यदक्षपणाने आमच्या चुका निदर्शनास आणुन देणारे प्रसन्न व्यक्तिमत्त्व असलेले, आमचे पूज्यनीय प्रेरणास्थान असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. महादेव गव्हाणे सर आणि उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे सर यांनी मला सतत दिलेले प्रोत्साहन व त्यांनी केलेले सहकार्य याबद्दल मी त्यांचे आभार न मानता त्यांच्या ऋणातच राहणे पसंत करीन.

कोणत्याही कार्याची पुर्तता होण्यासाठी उत्कृष्ट व चांगले मार्गदर्शन मिळणे आवश्यक असते. असेच मार्गदर्शक मला मिळाले, राजर्षी शाहू महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख लेफ्ट. डॉ. अर्चना टाक यांनी संपूर्ण प्रकल्प अभ्यास प्रक्रियेमध्ये केलेल्या उत्कृष्ट, अचुक व मौलिक मार्गदर्शनामुळेच मी प्रकल्प लेखन कार्य पूर्ण करू शकलो. त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून, प्रोत्साहन देऊन, वेळ, काळ व स्थळाचे बंधन न ठेवता निरपेक्ष व कर्तव्यबुध्दीने मार्गदर्शन केलेले आहे. तसेच त्यांनी या संपूर्ण प्रकल्पाची छपाई अल्पवेळेत व सुबकपणे विनामुल्य करून दिल्यामुळेच हे कार्य निहित वेळेत पूर्ण होऊ शकले. त्यामुळे मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

कुटुंबाच्या सहकार्याशिवाय कोणतेही काम करणे कठीण असते. कुटुंबाकडून आपल्याला मानसिक आधार मिळत असतो. असा मानसिक आधार दिल्याबद्दल मी माझे पूज्यनीय आई-वडील सौ. योजनाबाई व श्री. माधव इंद्राळे यांचे मनापासून आभार मानतो. माझी आजी पद्मीनबाई इंद्राळे, पुजारी श्री. प्रकाश स्वामी तसेच भावाप्रमाणेच सतत पाठीशी उभे असलेले माझे मित्र तेजस घाटूळे, प्रविण येरनाले व विवेक भोसले यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचेही मनापासून आभार मानतो.

**धन्यवाद !!!**

**संतोष माधव इंद्राळे**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **१** | **प्रकल्प अभ्यास पद्धती** | **१-६** |
| १ | प्रस्तावना | १ |
| २ | प्रकल्प अभ्यास विषयाची निवड | २ |
| ३ | पूर्व अभ्यासाचा आढावा | २ |
| ४ | प्रकल्प अभ्यास विषयाची गरज | २-३ |
| ५ | प्रकल्प अभ्यास विषयाचे महत्व | ३ |
| ६ | समस्या विधान | ३ |
| ७ | प्रकल्प अभ्यास विषयाचे उद्देश | ३ |
| ८ | प्रकल्प अभ्यासाची गृहीतके | ४ |
| ९ | प्रकल्प अभ्यास प्रश्न | ४ |
| १० | प्रकल्प विषयाची व्याप्ती | ४ |
| ११ | प्रकल्प अभ्यासाची परिमर्यादा | ४ |
| १२ | प्रकल्प अभ्यासाची मर्यादा | ५ |
| १३ | माहिती संकलनाचे स्त्रोत | ५ |
| १४ | प्रकरण विभागणी | ५-६ |
| **२** | **श्री .संत मन्मथ स्वामींचे प्रारंभिक जीवन** | **७-११** |
| **३** | **संत मन्मथ स्वामींचे साहित्यातील योगदान** | **१२-२४** |
| **४** | **कार्तिकी पोर्णिमा यात्रा** | **२५-३१** |
| **५** | **उपसंहार** | **३२-३४** |
| | **संदर्भ सूची** | **३५** |

# प्रकरण पहिले :
# प्रकल्प अभ्यास पद्धती

## प्रकरण पहिले

## प्रकल्प अभ्यास पद्धती

### १. प्रस्तावना:

**"श्री. संत मन्मथ स्वामी महाराजांचे साहित्यिक योगदान : एक अभ्यास"** हा माझ्या प्रकल्प अभ्यासाचा विषय आहे. या प्रकल्पात कपिलाधार (जि. बीड) येथील देवस्थानचे आराध्य लिंगायत धर्माचे गुरू, प्रणेते, श्री. संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज यांच्या साहित्यिक योगदानावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न मी केला आहे.

मन्मथ स्वामी, हे नाव ऐकल्यास बहुतांश लोकांना प्रश्न पडतो की, हे कोण आहेत? हे व्यक्तिमत्व सध्याच्या काळातील तर नसावं ! मग कोण हे व्यक्तिमत्व? कोणता काळ त्यांचा? आणि आता का त्यांचा उल्लेख? काहींना कदाचित ते परिचित पण असतील, पण त्यांना ज्ञात होते तितकेच मर्यादित होते का मन्मथ स्वामी !!

लिंगायत धर्माचे प्रणेते व मार्गदर्शक श्री. संत मन्मथ स्वामी महाराज यांनी लिहिलेले अनेक ग्रंथ, कीर्तनप्रथा, कपिलधार हे ठिकाण या सर्वांचे वास्तववादी वर्णन करण्याचा पुरेपूर प्रयत्न करण्यात आला आहे.

वाढो लोकि सदाचार | सदविद्येचा भडिमार ||
होवो सर्वत्र साचार | हाची प्रसाद आवडे ||

अशा विश्वसुखाची कामना करणाऱ्या आदर्श व्यक्तिमत्वाची ओळख सर्व मानव जगताला झालीच पाहिजे. मन्मथस्वामींनी मराठीत विपुल काव्यरचना व ग्रंथरचना केली आहे, तथापि ती सर्वच प्रकाशित नाही. त्यांनी रचलेले शिवपर अंभग आजही मराठवाड्यातील वीरशैव लोक आवडीने वाचतात व गातात. गावोगाव 'मन्मथ भजनी मंडळे' ही आहेत. शिवाय त्यांनी षट्स्थलसिद्धांतावर रचलेल्या परमरहस्य ह्या आध्यात्मिक ग्रंथाचे पारायणही केले जाते.

## २. प्रकल्प अभ्यास विषयाची निवड:

सदरील प्रकल्प मी सोळाव्या शतकात होऊन गेलेल्या थोर संत साहित्यिक, शिवभक्त संत शिरोमणी श्री. मन्मथ महाराजांच्या साहित्यिक योगदानावर प्रकाश टाकण्याच्या हेतूने इतिहास विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर यांना सादर करीत आहे. ज्याप्रमाणे वारकरी संप्रदायामध्ये संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यांचा उल्लेख होतो त्याप्रमाणे वीरशैव पंथाच्या साहित्यात मन्मथ स्वामी, लक्ष्मण महाराज यांचा उल्लेख करावाच लागतो. वारकरी संप्रदायामध्ये श्रीहरी म्हणजेच विष्णूची आराधना केली जाते, श्रीकृष्णाला आराध्य मानून त्याची स्तुती करणारे साहित्य रचले जाते. वीरशैव पंथात शिवाला आराध्य मानून त्यांची स्तुती केली जाते. म्हणून शिवाला केंद्रित करून साहित्य निर्माण केलेल्या मन्मथ माऊलीच्या जीवनावर प्रकाश टाकण्यासाठी मी संदर्भित प्रकल्प सादर करत आहे.

## ३. पूर्व अभ्यासाचा आढावा:

श्री. संत शिरोमणी मन्मथ महाराजांच्या जीवनावर खूप कमी संशोधने झाली आहेत. यामध्ये प्रामुख्याने माधव दत्तात्रेय मोरे यांचा "मराठवाड्यातील वीरशैव संत साहित्य : एक विवेचक अभ्यास" हा प्रकल्प उल्लेखनीय ठरतो. परंतु या संशोधनात मन्मथ महाराजांच्या फक्त साहित्य या अंगावरच भर दिल्याचा दिसून येतो. मन्मथ स्वामींच्या समग्र आणि सर्वांगीण जीवनावर समग्र लेखन झालेले नाही. माझ्या प्रकल्पामध्ये साहित्याबरोबरच जीवन कार्याचा थोडक्यात का होईना अभ्यास केलेला आहे.

## ४. प्रकल्प अभ्यासाची गरज: (Needs of the Research)

१. इतर अभ्यासकांना कार्यप्रेरणा मिळवण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

२. या विषयावर कमी प्रमाणात अभ्यास झालेला आहे. त्यामुळे सदर विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

३. महाराष्ट्राच्या इतिहासात एकोणिसाव्या शतकात होऊन गेलेल्या समाजसुधारणा चळवळी सखोलपणे जाणून घ्यायच्या असतील तर  सदर विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

४. महाराष्ट्रातील प्रबोधनाचा इतिहास यासंदर्भात अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना अभ्यासाची दिशा मिळण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

**५. प्रकल्प अभ्यासाचे महत्व: (Significance of the Research)**

१) संत मन्मथ स्वामी यांचे साहित्याच्या क्षेत्रातील योगदान समजण्याकरीता सदर विषयावर अभ्यास होणे महत्वाचे आहे.

२) महाराष्ट्राच्या इतिहासात एकोणिसाव्या शतकात होऊन गेलेल्या समाजसुधारणा चळवळीमध्ये संत मन्मथ स्वामी यांच्या साहित्याने कशा प्रकारे योगदान दिलेले आहे, हे समजण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे महत्वाचे आहे.

३) संत मन्मथ स्वामी यांचे साहित्याच्या क्षेत्रातील योगदान सद्यस्थितीत प्रेरणादायी ठरविण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे महत्वाचे आहे.

**६. समस्या विधान : (Origin of the Research Problem)**

संत मन्मथ स्वामी यांच्या साहित्याचा व कार्याचा महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या चळवळीच्या दृष्टीने

अभ्यास करणे.

**७. प्रकल्प अभ्यास विषयाचे उद्देश :- (Objectives)**

१. सोळाव्या व सतराव्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. संतांचे जीवन व त्यांनी निर्माण केलेले साहित्य यांची जीवनामध्ये काय उपयुक्तता आहे याचा अभ्यास करणे.

३. संत मन्मथ स्वामी यांच्या साहित्याचा अभ्यास करणे.

**८. प्रकल्प अभ्यासाची गृहीतके:**

१. संत मन्मथ स्वामी हे महाराष्ट्रातील संत परंपरेतील एक महत्वाचे संत होते..

२. महाराष्ट्राच्या इतिहासात एकोणिसाव्या शतकात होऊन गेलेल्या समाजसुधारणा चळवळीवर संत मन्मथ स्वामी यांच्या जीवन व साहित्याचा सकारात्मक प्रभाव पडलेला आहे.

**९. प्रकल्प अभ्यास प्रश्न:**

१. संत साहित्य म्हणजे काय?

२. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात संत मन्मथ स्वामी यांच्या कार्याने व साहित्याने कशा प्रकारे योगदान दिलेले आहे?

३. महाराष्ट्राच्या इतिहासात एकोणिसाव्या शतकात होऊन गेलेल्या समाजसुधारणा चळवळीमध्ये संत मन्मथ स्वामी यांच्या जीवन व साहित्याने कशा प्रकारे योगदान दिलेले आहे**?**

१०. **प्रकल्प अभ्यासाची व्याप्ती: (Scope of the Research)**

१. प्रस्तुत अभ्यास हा महाराष्ट्राच्या सामाजिक व धार्मिक इतिहासाशी संबंधित आहे.

११. **प्रकल्प अभ्यासाची परिमर्यादा: (De-Limitations of the Research)**

१. प्रस्तुत अभ्यासात फक्त महाराष्ट्र राज्यातील उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर या गावाचाच विचार केलेला आहे .

२. प्रस्तुत अभ्यासात फक्त संत मन्मथ स्वामी या एकाच संतांच्या जीवन कार्याचा व साहित्याचा विचार केलेला आहे.

## १२. प्रकल्प अभ्यासाची मर्यादा: (Limitations of the Research)

१. प्रस्तुत अभ्यासासाठी वापरली जाणारी संदर्भ साधने संशोधक तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार प्रमाणित करणार आहे.

२. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे संदर्भ साधनांचा अभ्यास व चिंतन यावर अवलंबून असणार आहेत.

## १३. माहिती संकलनाचे स्त्रोत:-

प्रस्तुत प्रकल्पासाठी नव्याने साधने शोधून त्याआधारे अभ्यास करण्यात आलेला आहे. त्याकरिता सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

१. विविध संदर्भ ग्रंथ, चरित्र व आत्मचरित्रपर ग्रंथ यांचा वापर प्रस्तुत अभ्यासासाठी करण्यात आलेला आहे.

२. संकेतस्थळावरून प्रस्तुत अभ्यासासाठी माहिती मिळविण्यात आलेली आहे.

## १४. प्रकरण विभागणी:

**प्रकरण १ : प्रकल्प अभ्यास पद्धती:**

प्रस्तुत प्रकरणामध्ये या प्रकल्पाकरिता वापरण्यात आलेल्या संशोधन पध्दतीचा आढावा घेण्यात आलेला आहे. संशोधनासाठी प्रस्तुत विषयाची निवड केल्यानंतर त्या विषयाचे महत्व, संशोधन विषयाची उद्दिष्टे, गृहीतके, व्याप्ती व मर्यादा मांडण्यात आली आहे. तसेच या विषयावर यापूर्वी संशोधन झालेले आहे किंवा नाही याची पडताळणी करण्यात आली असता असे दिसून आले की, या विषयावरती पुर्णपणे संशोधन झालेले नाही. या विषयाचा सखोलपणे अभ्यास करण्यासाठी उपलब्ध असलेल्या साधनांचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण २ : संत मन्मथ स्वामींचे प्रारंभिक जीवन:**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संत मन्मथ स्वामी महाराजांच्या प्रारंभिक जीवनाविषयी, त्यांचे बालपण, काव्यलेखनास सुरुवात याविषयी लिहिण्यात आलेले आहे.

**प्रकरण ३ : संत मन्मथ स्वामींचे साहित्यातील योगदान:**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संत मन्मथ स्वामी यांची साहित्य निर्मिती व त्यांच्या साहित्यातून समाजाचे प्रबोधन त्यांनी कशाप्रकारे केले आहे, यासंदर्भात मांडणी करण्यात आलेली आहे.

**प्रकरण ४ : उपसंहार**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संपूर्ण प्रकल्पाचे सार मांडण्यात आले आहे.

# प्रकरण दुसरे :
# संत मन्मथ स्वामींचे प्रारंभिक जीवन

## प्रकरण दुसरे

## संत मन्मथ स्वामींचे प्रारंभिक जीवन


संतशिरोमणी श्री. मन्मथ स्वामी महाराज यांचा जन्म बीड जिल्ह्यातील निनगुर (आताचे नेकनुर) या गावी शके १४८२ म्हणजेच इ.स. १५६० यावर्षी झाला. निनगुर हे मन्मथ स्वामीचे स्वतःचे गाव नसून ते त्यांचे आजोळ म्हणजेच आजोबांचे गाव होते.




**श्री. क्षेत्र मन्मथधामचे हवाई चित्रणातून घेतलेले छायाचित्र**

संत माऊलीचे वडील श्री. शिवलिंग स्वामी हे कळंब (जि. उस्मानाबाद) येथील रहिवासी होते आणि त्यांचा विवाह निनगुरच्या माहेश्वर कुळातील पार्वतीबाई यांच्याशी झालेला होता. उभय पती-पत्नी अत्यंत श्रद्धावान शिवभक्त होते. बराच काळापर्यंत त्यांना अपत्य प्राप्ती झाली नाही. अपत्य प्राप्ती करिता गुरुलिंग जंगमाची एकनिष्ठपणे सेवा करणाऱ्या उभय पतीपत्नीनी कुलगुरुच्या दर्शनाशीर्वादाने आपणास पुत्रप्राप्ती होईल या धारणेने माणूरास प्रयाण केले.

गुरुपीठांत त्यांचा कृपाशीर्वाद प्राप्त करुन घेऊन त्यांच्याच आज्ञेप्रमाणे स्वगृही परतले आणि गुरुलिंग जंगम दासोह सतत एक वर्ष पर्यंत चालविल्यानंतर त्यांना पुत्रप्राप्ती झाली. त्यांनी सद्गुरु बसवराज यांच्या आज्ञेप्रमाणे पुत्राचे नांव मन्मथ असे ठेवले. जन्मतः विलक्षण प्रतिभासंपन्न असल्यामुळे आणि स्वतःचे घर हेच धार्मिक शिक्षणाचे केंद्र असल्यामुळे त्यांना ते धार्मिक शिक्षण प्राप्त करुन घेताना कसल्याही प्रकारचे कष्ट झाले नाहीत.



**श्री. मन्मथ स्वामी महाराज**

**संदर्भ : गूगल**

**काव्यलेखनाकडे वाटचाल:**

मन्मथ स्वामी यांच्या घरीच शायरी काव्याची परंपरा असल्यामुळे बालपणापासून त्यांची ओढ मराठी काव्याकडे असल्याची दिसून येते. आपल्या युवावस्थेच्या आरंभापासूनच लोककाव्य

निर्माण करण्याचा प्रयास आरंभीला, त्याच्या समकालीन व उत्तरकालीन अनेक कवींनी केलेला होता.

बालपणी दांडु डफाचा धुंधकार । जिंकिले शाहिर नेणी किती

असा आदरपूर्वक त्यांच्या काव्य शैलीचा व बालपणातल्या काव्याभिरुचीचा उल्लेख केला आहे. या त्यांच्या वर्णनावरुन मन्मथ माऊलीच्या काळात शाहिरी साहित्य म्हणजे लावणी, पदे, कटाव इ. काव्यपद्धती अस्तित्वात होती असे स्पष्ट होते. यामुळे मन्मथ माऊलीचा संपर्क सहजगत्या धार्मिक साहित्याकडे वळल्यास आश्चर्य वाटणार नाही.

शिक्षण आणि अध्यात्मिक ग्रंथाध्ययन यामुळे मन्मथ माऊलीच्या मनात गुरूच्या संगतीविषयी उत्सुकता निर्माण झाली आणि इ.स. १५०४ च्या सुमारास त्यानी तत्कालीन माणूर मठ सिंहासनाधिपती चरपट्टाध्यक्ष श्री. बस्वराज स्वामी महाराजांच्या चरणांचा आश्रय घेतला. आई वडिलांच्या आज्ञेप्रमाणे गुरुगृही वास करुन संस्कृत, कन्नड आदी भाषेतील धर्मग्रंथाचे अध्ययन केले. त्यानंतर गुरु आज्ञेने स्वगृही कळंबास आले. याच सुमारास वडील शिवैक्य झाल्यामुळे त्यांच्या संवेदनाक्षम मनावर अधिकच परिणाम झाला. त्यांनी आपल्या भजन सांप्रदायी भक्त मंडळीसह तीर्थ यात्रेचा उपक्रम सुरु केला.

मन्मथ स्वामी मोठमोठ्या प्रसिद्ध तीर्थांना भेटी देत व प्रत्येक गावांत किर्तन व धर्मोपदेश करीत असत. त्यावेळी त्यांच्या मनांत एकांतवासाची तीव्र इच्छा उत्पन्न झाली, आणि त्यांनी कळंब पासून जवळच असलेल्या हरगुंडी सध्याचे हडोंगरी येथील कड्या मध्ये गुंफा बांधुन निवास केला. तेथे असताना सतत भजन किर्तन आणि शिवनामघोषाने तो कडा नेहमीच गर्जत असे. म्हणूनच या कड्यास त्या काळापसून शिवकडा हे सार्थ नांव प्राप्त झाले. आजही ते ठिकाण ‘भूम’ तालुक्यात शिवकडा या नावाने ओळखले जाते, ज्या ठिकाणी संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज रहात असत, तेथेच त्यानी शिवलिंगाची प्रतिष्ठापना केली आहे. त्या देवस्थानाचे नावाने आत्तापर्यंत सुमारे पन्नास एकर जमीन लावलेली आहे. त्याबद्दलची अख्यायीका अशी आहे की, मन्मथ माऊलीच्या नंतरच्या काळात ज्या वेळी भूमची जहागिर रावरंभाकडे होती, त्या वेळी

रावरंभा स्वतः शिकारी करिता शिवकड्याच्या डोंगराकडे जात असत. त्यांना वाघाची शिकार करण्याची फार हौस होती. एकदा अचानकपणे वाघाचा शोध करीत निघाले असताना त्या कड्यावर ज्या ठिकाणी मन्मथ माऊली बसत असत, ठिक त्याच ठिकाणी त्यांना एक भला मोठा वाघ दिसला. त्यांच्या शिकारी करिता रावरंभा पुढे सरसावून गेले. पुढे जातात तो त्या ठिकाणी भगवे वस्त्र धारण केलेला जटामुकुट मंडित तेजस्वी साधु दिसला. आश्चर्यचकित होऊन रावरंभा पुढे निघाले नि जवळ जावून पहातात तो त्या ठिकाणी एक साधा ओटा असून त्यावर एक अत्यंत सुंदर शिवलिंग असलेले दिसून आले.

उपरोक्त चमत्काराने रावरंभाच्या अंतःकरणात असीम श्रद्धा उत्पन्न झाली आणि त्यांनी तात्काळ हुकूम देवून ते स्थान पवित्र केले आणि पहिल्याच सोमवारा पासून शिवपूजेचा संकल्प केला, त्याप्रमाणे सहपरिवार येवून त्या संत शिरोमणी मन्मथ माऊलीने स्थापन केलेल्या शिवलिंगास यथा सांग अभिषेक केला. त्यावेळी त्यांच्या बरोबर असलेल्या त्यांच्या कन्येने शिवलिंगासमोर नवस केला की माझे पति माझ्यावर प्रसन्न होऊन मला माझ्या घरी नेतील तर मी तुमच्या सतत पूजनाची व्यवस्था करीन. त्या मुलीची इच्छा त्या माऊलीच्या कृपेने पूर्ण झाली. भाविक मुलीने तीला दुधाची वाटी म्हणून वडिलांनी आंदण दिलेली सुमारे ५० एकर एवढी जमीन मंदीराच्या पूजेअर्चे करिता दिली, अशी एक प्रख्यात कथा आहे. ती जमीन अद्यापही मंदिराच्या हरंगुडी येथील पुजाऱ्याच्या व्यवस्थेखाली असून तिच्या उत्पन्नातून पूजाअर्चा व प्रतिवर्षी फाल्गुन शुद्ध तृतियेस महापूजा, अन्नदान वगैरे होत असते.

या काळात माऊलीची प्रवृत्ती आध्यात्मिक ग्रंथनिर्मिती कडे वळली, या पूर्वी बालपणातच त्यानी आपल्या अलौकिक प्रतिभेचा परिचय शाहीरी वाङ्मय निर्मिती करुन जनसामान्यास दिला होता. त्यांचे काव्य कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामीळनाडू मध्ये देखील असल्याचे समजते. ग्रंथ निर्मिमध्ये प्रथम त्यांचा कल अद्वैताकडे असल्याचे दिसून येत. मन्मथ माऊली पराकाष्टेचे गुरुभक्त असल्याने प्रथम त्यांनी गुरुगीतेवर मराठी आवरण चढवले. त्यानंतर चारीदेहाचे निराकरण करणारा स्वयंप्रकाश हा ग्रंथ लिहीला असला पाहिजे. कारण अद्वैतवाद हा जनसामान्यांत रुढ

असा अध्यात्मवाद आहे. त्याचाच प्रभाव प्रथम सामान्य साधकांवर पडतो. असा सामान्य अनुभव आहे आणि त्यातूनच पुढे त्याचा विकास सुरु होतो. अशा रितीने प्रथम मायावाद प्रतिपादन करीत असतानाच ज्ञानबोधाचा अवतार झाला. पाठोपाठ गुरुनागो हा नागेशस्तवानात्मक ग्रंथ लिहीला. ही ग्रंथ रचना शिवकडा येथील निवास काळांत झाली. याच काळात माऊलीनी आगळया वेगळया प्रतिभेचा अनुभवानंद हा ग्रंथ लिहीला.

सामान्य साधक, सिद्ध साधक अथातो धर्म जिज्ञासा आणि ती पूर्ण झाली म्हणजे अथातो ब्रह्मजिज्ञासा वर येतो. आणि शेवटी परत अहं ब्रह्मास्मि मीच शिव आहे इथे येऊन थांबतो, ही वेदांताची रुढ चाकोरी आहे. निदान मराठी संतानी तरी ही कोठेही बदलेली दिसत नाही. माऊली मात्र याला अपवाद आहेत. त्यांनी जिज्ञासेस रुढ चाकोरी सोडून अथातो आत्म जिज्ञासा असा क्रांतिकारक बदल वेदांत प्रतिपादनात केला.

माऊलीचा प्रबुद्ध शिष्य म्हणतो, महाराज !

इतर शिष्यजे प्रश्न करिती । ब्रह्म कैसे म्हणोनि पुसती !

तरि माझे पुसणे तैसे नव्हे स्वानन्दमूती । मी कां तैसे पुसू ।

पुढे, तो म्हणतो,

माझे पुसणे ऐसे असे माझे ब्रह्माहूनि काय खोळंबले असे ।

मी कोण ते जाणतुनसे। ते जाणवा आधी मज।

मला कोण हे समजले पाहिजे. याला उत्तर देताना दयामय सद्‌गुरुनाथाच्या शब्दांत माऊली म्हणतात-

श्री गुरु म्हणति भला रे भला । त्वा परवा प्रश्न केला।

नाही देखिला प्रश्नकर्ता कोणि |

अशा रितीने शिष्याची पाठ थोपटून त्यांचे समाधान केले, असा हा आहे अनुभवानन्द. अशाच प्रकारची काव्यरचनाही त्यांनी परमरहस्य या ग्रंथात देखील असाच संवाद महादेव आणि पार्वतीच्या मुखातून वर्तवला आहे.

# प्रकरण तिसरे :
# संत मन्मथ स्वामींचे साहित्यातील योगदान

## प्रकरण तिसरे

## संत मन्मथ स्वामींचे साहित्यातील योगदान

### ग्रंथ रचना:

याच काळात माऊलीची प्रवृत्ती आत्यात्मिक ग्रंथनिर्मिती कडे वळली. यापूर्वी बालपणातच त्यांनी आपल्या अलौकिक प्रतिभेचा परिचय शाहीरी वाङमय निर्मिती करुन जनसाधारणास दिला होता. त्यांचे लावण्य, कटाव आदी स्फुट काव्य कर्नाटक, आंध्रा, तामीळनाडू मध्ये देखील असल्याचे समजते. ग्रंथ निर्मिमध्ये प्रथम त्यांचा कल अद्वैताकडे असल्याचे दिसून येतो. प्रथम क्रमांक येतो तो गुरुगीतेचा मन्मथ माऊली पराकाष्टेचे गुरुभक्त असल्याने प्रथम त्यांनी गुरु गीतेवर मराठी अकंकरण चढवलेले त्यानंतर चारीदेहाचे निराकरण करणारा स्वयंप्रकाश हा ग्रंथ लिहीला असला पाहिजे कारण अद्वैतवाद हा जनसाधारणांत रुढ असा अध्यात्मवाद आहे. त्याचाच प्रभाव प्रथम सामान्य साधकांवर पडतो.असा सामान्य अनुभव आहे आणि त्यातूनच पुढे त्याचा विकास सुरु होतो. अशा रितीने प्रथम मायावाद प्रतिपादन करीत असतानाच ज्ञानबोधाचा अवतार झाला पाठोपाठ गुरुनागो हा नागेशस्तवा नात्मक ग्रंथ लिहीला ही ग्रंथ रचना शिवकडा येथील निवास काळांत झाली. गुरुगीतेचा पण काल हाच या काळीच माऊलीनी आगळया- वेगळया प्रतिभेचा अनुभवानंद हा ग्रंथ लिहीला. सामान्य साधक, सिद्ध साधक अथातो धर्म जिज्ञासा आणि ती पूर्ण झाली म्हणजे अथातो ब्रह्मजिज्ञासा वर येतो. आणि शेवटी परत अहं ब्रह्मास्मि मीच शिव आहे इथे येऊन थांबतो, ही वेदांताची रुढ चाकोरी आहे. निदान मराठी संतानी तरी ही कोठेही बदलेली दिसत नाही. माऊली मात्र याला अपवाद आहेत. त्यांनी अथातो जिज्ञासेस रुढ चाकोरी सोडून अथातो आत्म जिज्ञासा असा क्रांतिकारक बदल वेदांत प्रतिपादनात केला. माऊलीचा प्रबुद्ध शिष्य म्हणतो महाराज ! इतर शिष्यजे प्रश्न करिती । ब्रह्म कैसे म्हणोनि पुसती ! तरि माझे पुसणे तैसे नव्हे स्वानन्दमूती । मी कां तैसे पुसू पुढे, तो म्हणतो माझे पुसणे ऐसे असे माझे ब्रह्माहूनि काय खोळंबले असे मी कोण ते जाणतुनसे। ते जाणवा आधी मज मला कोण

हे समजले पाहिजे.  याला उत्तर देताना दयामय सद्‌गुरुनाथाच्या शब्दांत माऊली म्हणतात– श्री गुरु म्हणति भला रे भला । त्वा परवा प्रश्न केला। ऐसा नाही देखिला प्रश्नकर्ता कोणि अशा रितीने शिष्याची पाठ थोपटून त्यांचे समाधान 1  केले,  असा हा आहे अनुभवानन्द.

**स्वयंप्रकाश**

हा सामान्य वेदांत प्रतिपादन करणारा ग्रंथ आहे.  यात स्थूल सूक्ष्म,  कारणादि देह, तत्वमस्यादि महावाक्य मुक्ति व मुक्त यांच्या स्वरुपाचे सूत्रबद्धपणे विवेचन केले आहे.  माऊलींनी ग्रंथाचा आधार प्रस्थानत्रयी असल्याचा स्पष्ट उल्लेख केला आहे.  ते म्हणतात हे सार उपनिषदाचे । हे बीजाक्षर वेदशास्त्राचे। हे हेगुहा गुजसिद्धांतीचे। मथुनि काढीले  आणि याची साक्ष म्हणोन त्यांच्याग्रंथातून गीतेचे श्लोक श्लोकार्थ ओवीतून गोविलेले अढळून येईल त्या काळाचा सामान्य साधक प्रथम प्रस्थानत्रयी–  गीता उपनिषदे,  आणि ब्रह्मसूत्रे यांच्या कडेच वळतो आचार्य शंकर मध्व रामानुज,  निंबार्क,  श्रीकंट आणि शक्तिविशिष्टाद्वैत प्रतिपादन करणारे प्रख्यात आचार्य ज्यानी ब्रह्मसूत्रकार व्यासाचे खरे हुद्गत उघडे केले,व्यास मायावादी या द्वैती नसुन ते परिणामवादी होते हे त्यांच्या सूत्रावरुनच सिद्धकरून दाखविणारे श्रीपतिपंडिताराध्य यानी पण प्रस्थानत्रयीचाच आधार घेतला आहे.इतकेच नव्हे तर ब्रह्मसूत्राऐवजी शिवसूत्रावरच भर देणाऱ्या काश्मिरीय क्षेमराज अभिनवगुप्त रामकंठ इत्यादि महापंडितांनी देखील गीता उपनिषद यांच्यावर आपली लेखणी चालविली आहे.  पं.  रामकंठाने तर गीत्तेवर शिवपर व्याख्या केली आहे गीता हा कर्म उपासना व ज्ञान सांगणारा ग्रंथ असल्यामुळे यातील स्वमतास अनुकुल भाग तो प्रत्येकाने घेतला आहे,  त्याला प्रथम अवस्थेत माऊलीहि अपवाद नाहीत त्यानी गीतेतील काही वाक्याचा जसाचा तसाच मराठी अनुवाद न करता उल्लेख केला आहे  आणि असाच पुढेहि केलेला दिसुन येतो.  इतकेच नव्हे तर त्या काळात रचले गेलेल्या अभंगातूनहि "गीतेमाजि हरि बोलिले वचन । कर्माचीहीगहन। गती असे"  असा स्पष्ट उल्लेख केला आहे,  या अशा उदाहरणामूळे त्याच्या

साहित्यावर गीतेचाच प्रभाव होता किंवा ते पूर्णपणे गीतानुयायी होते हे म्हणणे थोडे साहसाचे होईल. सर्व सामान्यपणे वेदांताचे विषय पण एकच असल्यामुळे

स्वयंप्रकाश या ग्रंथात चहुदेहाचे विवरण देऊन त्याचे निराकरण केले आहे. तसेच पुढेचारी वेदाच्या तत्वमस्यादि महावाक्याच्या अर्थाचे विवेचन चारी मुक्तीचे विवेचन केले आहे निर्गुण सायुज्यता मुक्तीचे विवेचन पण केले आहे. ध्यान म्हणजे काय व ते कसे करावे पण विवेचन भावमधुर भाषेत केले आहे आणि शेवटी मुक्त पुरुष संतजन यांचे स्वरुप कसे असते हे जळमोकळे जलचमस। आकाश मोकळे पृथ्वी कुळास । तैसा मोकळा सर्वांस। मुक्तपणे इत्यादी ओवीतून मुक्ताचे स्वरुप सांगितले आहे.ज्येष्ठ संशोधक या प्रकरण ग्रंथास कांही विषय वा कांही दृष्टांताच्या साम्यावरुन मुकूंदराजकृत विवेकसिंधुचा विस्तार म्हणतात.विवेकसिंधुची व्याप्ती पाहाता त्याचा विस्तार अथवा टीका म्हणणे कोणत्याही परिस्थितीत योग्य होणार नाही. कारण त्यांचा विषय एकच असल्यामुळेच साहजिकच दृष्टांत उदाहरण याचे ठिकठिकाणी साम्यत्व येणे " स्वाभाविकच आहे, त्यामुळे कांही साम्य स्थळावरुन त्या ग्रंथाचे मौलिकत्व हिरऊन घेण्याचा प्रयत्न हा पूर्वग्रहदूषित दोष म्हणल्यास वावगे ठरु नये. तसे पाहता विवेकसिंधु प्रकाशदीप आणि दीपरत्नाकर हे जवळ जवळ सारखे विषयच प्रतिपादन करतात त्यामुळे त्यांचे मौलिकत्व केंव्हाही खंडीत होऊ नये. विस्तार अथवा टीका करीत असताना टीकाकार अथवा विस्तारक आवश्यकपूर्व ग्रंथकारांचा उल्लेख करतोच. उ. अमृतानुभवाचा टीका विस्तार करणाऱ्या शिवदीन केसरी सारख्यानी स्पष्ट उल्लेख केला आहे. तसे माऊलीने आवश्य केले असते. त्यानी परमरहस्य गुरुगीता शिवगीता इत्यादी ग्रंथातून योग्य असा उल्लेख केला आहेच. इतकेच नव्हे तर इतर ग्रंथकारासारखे ग्रंथाचे कर्तृत्व कधीही आपल्याकडे घेतले नाही.ते पराकोटीचे निराभिमानी असे संत होते त्यानी "यालागी ग्रंथकर्ता श्रीगुरुनाथ। तोचि वदला ग्रंथार्थ (परमरहस्य) अशा प्रकारचे ग्रंथकर्तृत्व श्रीगुरुनाथाकडे सोपविले आहे. अशा संताचे मौलिकत्व हिराऊन दुसऱ्याकडे देण्यामध्ये महाराष्ट्र सारस्वतकराची "जंगमाना स्वतःच्या पोतेडीत घातले" हीच संकुचित दृष्टी दिसून येते.येवीतेवी संताच्या ब्रह्ममयातील अनुभूती विषयी एकात्मता असणे

हे अनुकरण म्हणता येणार नाही. ती केवळ अनुभूतीच म्हणता येईल. विवेकसिंधुकारानी न सांगितलेले विषय स्वयंप्रकाशमध्ये माऊलीने दिले आहेत त्याचे काय ? त्याही विषयाचा कुठल्यातरी ग्रंथाशी संबंध लावण्याचा प्रयत्न ही मंडळी करीलच स्वयंप्रकाश हा आहे तो केंव्हाही पर प्रकाश नाही. हे विशुद्ध दृष्टीने विचार केल्यास निश्चयाने दिसून येईल.

**ज्ञानबोध**

हा ग्रंथ गुरु शिष्य संवादरुप आहे. त्यांत ज्ञान म्हणजे काय व अज्ञान म्हणजे काय? असे प्रश्न उभाकरुन त्यानांव ज्ञान, तसेच त्याना अज्ञान, त्यानांव अज्ञान असे दृष्टीकरण न्यायाने श्रोत्यांच्या मनावर आपले विचार पूर्णपणे बिंबविण्याकरिता अनेक आवर्तने त्यानांव यांची केली आहेत. ज्ञान अज्ञाना बरोबरच वैराग्य, भक्ति, त्वं पदाचे विवेचन, तत्पदाचे विवेचन, तसेच असिपदाचे विवेचन केले आहे. यानंतर संतमहिमा वर्णन करताना माऊली म्हणतात,

ऐसे संत जे निजानंद भरीत । ते कृपाळु अनाथाचे नाथ ।

संत असे असतात अशा संताना

धरुनिया भाव भक्ति विश्वास शरण जावे साधु संतास।
ते करिती स्वयंप्रकाश। भव पाश छेदुनि ।

त्यांना शरण गेल्याने त्याला स्वयंप्रकाश करतात. ज्याप्रमाणे धर्माची दहा लक्षणे सांगितली आहेत त्याप्रमाणे माऊलीनी संताची पण लक्षणे दहाच सांगितली आहे,

ती निराभिमानी निर्द्वंद्व । दया शांती अक्रोध ।

भजन शम दम त्याग अभेद। इहि लक्षणी जे संत जाणावे।

अशाप्रकारे सांगून प्रत्येकाचे विशदीकरण केले आहे. उपसंहार करताना माऊलींनी नागेश यांच्या नामाचा सुमारे ६ वेळा स्वतः मन्मथशिवलिंग या नावाचा ३ वेळा उल्लेख करुन शेवटी

इति श्री ज्ञानबोध । गुरुज्ञानचि प्रसिद्ध ।
ऐकता होय स्वयबोध । म्हणोनि पाहिजे संती ।

असा केला आहे.

**गुरुगीता**

संस्कृत श्लोक देऊन त्याची टीका ओवीबद्ध रूपाने केली आहे, यांत श्रीगुरुस्वरुप, ध्यान, भक्ति आदिविषयाबरोबरच श्रीगुरुचे लक्षण पण दिले आहे. यातहि माऊलिची वैशिष्ट्यपूर्ण प्रतिपादनाने शैली उठावदारपणे दिसून येतात.

**शिवगीता**

हाहि टीका ग्रंथ असून रामाला शिवाने जो उपदेश केला त्याचे ललित भाषेतून वर्णन केले आहे. या शिवगीतेनंतर जो क्रम येतो तो श्रीपरमरहस्य ग्रंथाचा.

**श्रीपरमरहस्य**

संत शिरोमणी मन्मथ माऊलीच्या अनेक ग्रंथात श्रीपरमरहस्य हा अत्यंत सुंदर असा ग्रंथ आहे. यात माऊलीनी शिवसंस्कृतिची आचार विचार परंपरा पूर्णतया मराठीत आणून ठेवली आहे. अष्टावरण, पंचाचार आणि षट्स्थल याचा जीवनाशी असलेला घनिष्ट संबंध वेगवेगळया अभ्यासातून सांगीतला आहे.अष्टावरणातील मुख्य आवरण "श्रीगुरु" यांचे सर्वात अधिक विवेचन केलेले आढळून येईल.कारण गुरुच्या योग्यतेवरच शिष्यांची सर्वांगिण उन्नते निर्भर असते. याची पूर्णजाणीव संत माऊलीना होती नव्हे त्याचा पूर्ण अनुभव पण तसा होता, असे माऊलीच्या जीवन चरित्राचे परिशिलन केल्यास दिसून येईल,त्यांचे जीवन चरित्र आम्ही वाचकांच्या पुढे ठेवले आहे.

१) गुरुचे महत्वच केवळ न सांगता त्याचे स्वरुप वर्तन क्रम "या लागी भूरुद्रदेशिकानी अलगत्वे वर्तावे जनी " अशा प्रकारच्या ओव्यातून सांगितला आहे. पहिला अध्याय जरि गुरुमहात्म्याचा

असला तरि इतर अध्यायातूनही गुरु विषयी पुष्कळच लिहीलेले आढळून येईल, माऊलीनी ममुक्षुकरिता आवश्यक ते गुरु विषयक मार्ग दर्शन केलेले आढळून येईल. अष्टावरणातील दुसरे आवरण जे शिवसंस्कृतिचे मुख्य अंग आहे. त्यालिंगा विषयी लिहिताना "लिंगे बोलाविल्या वेदुबोले "असे श्रुति प्रमाणे "तमेव भांतमनुभांतिसर्व तस्य भासा सर्वमिदम् विभाति" प्रमाणे त्या परशिव, परब्रह्म लिंगाचे पूर्ण एकमेवाद्विितीयत्व, सर्व कर्तृत्व, तसेच स्वाभिन्नानिमित्योत्पादनकरणत्वाचे प्रतिपादन केले आहे.

२) स्थूल देहाला इष्टलिंग सूक्ष्मदेहाला प्राणलिंग कारण देहाला महालिंग असा उपास्योपासकभाव दिला असून हे लिंग पुनः इष्टलिंगं, आचारलिंग, गुरुलिंग, प्राणलिंग, शिवलिंग जंगमलिंग, –भावलिंग, प्रसादलिंग, –महालिंग, अशा प्रकारे द्विविध होऊन एकूण नऊ लिंग झाले, अशी – नऊ लिंगे महालिंगात अंतर्भुत होतात आणि हे महालिंग नऊ लिंगाच्या रुपात • नटले आहे. याची प्राप्ति अनुभुति इष्टलिंगाच्या अर्चनेतूनच होते. त्यांच्या पूजेच्या वेळा व प्रकार आदि योग्य प्रकारे विस्तृत असा दिला आहे.

३) जंगमाचे स्वरुप आणि आचार याचे पण विवरण विस्तृतपणे दिले आहे. जंगम नित्यमुक्त सुक्ष्म आहे शांती, समता, सत्य, अहिंसा याचे स्वरुप फार सुंदर दिलेले आहे. माऊलीचे अपेक्षीत सत्य, भूतदयेने युक्त असलेले असे आहे. सत्य बोलण्यामुळे जर कोणाचा घात होत असेल तर ते सत्य सत्य नाही ते असत्य रुपी सत्य आहे. "नातरि साचचि बोलोनि निश्चितार्थ। येरिकडे होतसे घात। तरि ते साच न मानिती संत। सत्य रुपी असत्य म्हणोनि " इथे प्राणि मात्रा विषयी असलेला कारुण्य भाव अतिशयाने दिसून येतो. जंगमस्वरुप आणि भक्तस्वरुप यांचे वर्णनकरताना शिवाला अतिप्रिय असलेल्या सदाचाराचे वर्णन पण येऊन गेले आहे. अष्टावरणा बरोबर पंचाचार पण गोऊन दिले आहेत. अहिंसेचे स्वरूप ही हळूवारपणे त्यांना अपेक्षित असलेल्या शिवविकासवादाला घेवूनच मांडले आहे. "इकड जीव हिंसाकरी। आणि तिकडे माझी पुजा करी। त्याची कैसी घेऊ गौरी। मुखी घास माथी डांग तसेच दयेचे स्वरुप सांगताना माऊली

म्हणतात सारे शिवस्वरूप असताना एखाद्या प्राण्याच्या चुकीमुळे झालेल्या अपराधास दंड देणे म्हणजे स्वतः संच दंड देणे होय" का सर्वाभूति परमात्माचि असे।" म्हणोनि कोणासी दुःख देत नसे। यालागी दयानंदतसे। मूर्तिमंत तेथे।" अशाप्रकारची अनुभूति असून प्रात्यक्षिक जीवनमय तत्त्वा सारखेच असेल तोच तो जंगम आणि अशा प्रकारचा गुरु जंगम आणि लिंग शिवरुप आहे, त्यात भेद नाही असे माऊलीचे म्हणणे आहे, उलट पक्षि "वेशधारी जंगम होती। भ्रटाचारे ज्ञातीत वर्तती । उभयकुल नरका नेती। अधर्माभिमाने करोनि" अशाप्रकारे वेशधारी लोकांची स्पष्ट निभित्सना पण केली आहे.

४) पादोदका विषयी त्याच्या ठिकाणी अतीव श्रद्धा दिसते ती त्याना "गुरुतीर्थ बिंदूची सरी काशी नापावे बरोबरी।" तसेच "गंगा तीर्थी एक अवगण । खोली जाता जाय बुडोन। गुरुतीर्थ न बुडवी म्हणोन । तरोनि 1 जाती कैलासी ।" या शब्दानी व्यक्त केली आहे. तीर्थ म्हणजे काय व ते कोणाचे करावे व कसे करावे, याचे पण सुंदर विवेचन दुसऱ्या अध्यायात केले आहे. तीर्थ करावे तयाचे। सर्वांग पूर्ण असे जयाचे। तीर्थ न करावे अंगहीनाचे । रोगे व्यापिले शरीर जयाचे । तयाचे तीर्थ बोलिले नाही. "जो शिवयोगी सर्वांगी पुरता 'पादपुजा त्याची करावी" असे स्पष्ट पणे सांगितले आहे. तीर्थ विधी पण अत्यंत सोप्या भाषेत नि सुटसुटीत असा सांगितला आहे. पादोदक त्रिविध दशविध आणि दशत्रिविध असा त्याचा क्रम पण सांगितला आहे. माऊलीचे प्रत्येक वाक्य निश्चयात्मक असेच आहे. त्यांच्या अनुभूतीच त्यांच्या लेखणीतून उतरल्या आहेत.

५) जगातील प्रत्येक भोग्य पदार्थ हा आपण प्रसाद रुपाच घेतला पाहिजे असे माऊलीचे म्हणणे आहे. अनर्पित वस्तु ही शिवभक्ताला योग्य नाही. कारण ती वस्तु पदार्थ आहे. अतएव त्याचा उपभोग पतनाला कारण होतो, शिवभक्त हा "अनर्पित परि त्यागी" असा असतो. अन्नाच्या शुध्दिनेच तत्वाची आणि मनाची शुद्धि होते शुद्धात्म्याची कर्म सहजच शिवार्पण होतात. कर्मनिर्मुक्त होण्याचा प्रयत्न प्रत्येक महापुरुष करतो. माऊली म्हणतात वीरशैवाघरीचे अन्न पवित्र असे परि पूर्ण तयाचा अंश घरातून बाहेर कदा न जावा ॥ आणि तसेच "अमृताहूनी अधिक

प्रसाद मानी तो देख "असे प्रसादाचे महत्व सांगितले आहे. प्रसाद पण विविध आहे गुरुप्रसाद, लिंगप्रसाद आणि जंगमप्रसाद एकाच वेळी त्रिविध प्रसाद सेवन खरा प्रसादी करु शकतो आणि ते कसे कराये याचे विवेचन माऊलीने या ग्रंथात क्रियात्मक रितीने केले आहे.

६) विभुती विषयी माऊलीनी या ग्रंथात शिवभक्ताचे मुख्य चिन्ह या स्वरुपात वर्णन करुन त्याशिवाय शिवभक्तच नाही असे कथन केले आहे, माऊलीनी विभूतीवर एक स्वतंत्र स्फुट लिहिले आहे. भस्मधारणाची पद्धत आदि लिंगासी विभूती अवधरिजे। बोटी शेष उरले ते मस्तकी लाविजे । मग त्रपुंड्रचर्चिजे । ललाटभरी ।।" अशा प्रकारे सांगितली आहे. जो वेषय इतर ग्रंथातून स्पष्ट पणे लिहला आहे त्या माऊलीनी विशेष विवग विवेचन इतर ग्रंथकरानी केले नाही. अथवा करु शकले नाहीत. भस्म रुद्रक्ष याविषयी अनेक ग्रंथातून विस्ताराने विवरण झालेले असल्यामुळे माऊलीनी आपल्या ग्रंथात तो विषय संक्षेपाने सांगितला आहे.

७) अष्टावरणातील रुद्राक्ष या अवरणा विषयी कंठी रुद्राक्षमाळा मिरवत भक्त रायाच्या ।। अशा प्रकारे रुद्राक्ष भूषणा विषयी लिहले. रुद्राक्ष हे परम पावन असून त्याचे धारण अत्यंत आवश्यक आहे. असे माऊली म्हणतात. शिवसंस्कृतीमध्ये लिंग-शिव हा पती मानला असून अंग जीव हा सती 'पत्नी) मानलेला आहे. दीक्षा संस्कार म्हणजेच शिव जीव विवाह लिंग गाचे लग्न, त्यात भस्म अथवा विभूती हे सौभाग्यालंकरण कुंकू मानले आहे तर रुद्राक्ष सौभाग्य चिन्ह संगलसुत्रगृहीत धरले आहे अर्थात मानवी सौभाग्यात जितके महत्व मंगलसूत्र याला आहे, तितकेच महत्व रुद्राक्षाला शिवसंस्कृतीत आहे. वेगळया अर्थाने सांगावयाचे असल्यास प्रपंचात कुंकूम मंगलसूत्र याला जितके महत्व आहे तितकेच किंबहूना त्या पेक्षाहि अधिक महत्व भस्म रुद्राक्ष याला परमार्थात आहे.

८) मंत्रविषयी माऊलाची विशेष आस्था दिसून येते. त्यानी या मंत्राला सर्वश्रेष्ठ असे मानले आहे "एवं पंचाक्षरी विस्तार एका प्रणवा पासोनि साचार । जे का सप्तकोटि मंत्राचे सार वर्णिले शास्त्री "पंचाक्षरी मंत्राचा उद्धार देऊन हा मंत्र "सप्तकोटीषु मंत्रेषुमंत्रः पंचाक्षरो महान " या

म्हणी प्रमाणे सात कोटी मंत्रा पेक्षा याचे श्रेष्ठत्व वर्णन करुन त्याची जगत्पती ओमकारा पासून अक्षराच्या हारी। त्यामाजी निवडूनकाहडिलापंचाक्षरी । तोची निर्णय निरोपु अवधारी । ऐक चित्तदेऊनिया । " असे सांगुन एवं "पंचाक्षरी विस्तार। एका पासोनिसाचार । जे का सप्तकोटिमंत्राचे सार । वर्णिले शास्त्री।" अशा प्रकारे मंत्राचे श्रेष्ठत्व प्रतिपादन केले आहे. जीवनाची शारीरीक, मानसिक, सामाजिक, नैतिक, आर्थिक आदी उन्नती होऊन त्याला पारलौकीक आध्यात्मिक उन्नती करुन घेता यावी याकरिता शिवभक्ताचा मांगल्य आणि कौशल्यानी युक्त अग्ग्रा अद्वितीय सोपा जीवन मार्ग सांगितला आहे. त्याला शिवसंस्कृती मध्ये पंचाचार पांच जीवन मार्ग असे म्हणतात.

१) माऊलीच्या मताप्रमाणे सदाचारी मनुष्यच भक्त होऊ शकतो सदाचार नसेल तर त्याला भक्त होता येणार नाही. "सदाचारे शिवभक्तिने वर्तिजे असे सांगून दैनिकक्रियेचे प्रतिपादन "प्रातःकाळी उटेनिसत्वर । शौच मार्गे मौन धरुनी साचार । न बोलता परस्पर परतोनि यावे स्वग्रही ।" घरी येऊन " सप्तमृत्तिका करास लाऊन वरी उदक दूसऱ्याकडोन । घ्यावे तेणे क्रिया शुद्ध ।" इथे महत्वाचा शब्द दुसऱ्या कडोन हा आहे इतर भवी लोक स्वतःच स्वताच्या हातानें पाणी घेतात त्याचा परिणाम बरा नाही असे माऊलीचे म्हणणे आहे. असेच पादप्रक्षालन करुन । मग लिंगोदके ६६ मुखमंडन । दंताचा मधुवून टाकी सत्यप्रतिदिनी ।" दात धुवित असताना तोंडातील अर्ध्या उच्छिष्ट पाण्याने तोंड न धुण्याविषयी " म्हणोनि अर्थ करी । ऐसे जलन घालीजे ललाटावरी। ऐसे न विचारीनि घालिजे जरि । तरि दोषी होईजे। " तोंड धुणें झाल्यास स्नान करुनच सर्व क्रिया कराव्या असे सांगत स्नान केल्याविणें स्वंयपाक केलिया अनाचार पातक। घडे एसे शस्त्रादिक । सांगती धर्म ग्रंथी ॥" स्त्रिया विषयी पण माऊली "खिया शुचिर्भुत असाव्या सदा । भवि स्पर्श न करावा कदा जरी संसारी असे अपदा । तरि आचारा सोडू नये।" याची फलश्रुती स्वधर्माचारे वर्तता। इंद्र संपत्ती ये हाता। खोटे नाही ओ सर्वथा । स्वधर्म निष्टा श्रेष्ट असे सांगतात.

२) सदाचारी शिवभक्ताने शिव शिवभक्त आणि एकूण शिवस्वरुप सृष्टिशी अत्यंत नम्रतेने वागावे हा दुसरा भ्रत्याचार आहे. माऊली म्हणतात. सेवक भाव अंगी धरोनि । भक्तिचा अभिमान सांडोनि । एक भाव लिंगजंगम पूजनी करि तोचि उत्तम भक्त।" प्राणी मात्राची सेवा म्हणजेच शिवाची सेवा होय असे भृत्याचारी मानतो. किंकर वाणिवृत्ति धरोनि । शांती रुपी मनलीन होऊनी। लिंग जंगम एक रुप मानोनी । सद्भावे पूजीजे" प्रत्येक शिवभक्ता पुढे किंकरवाणी । महाराज चारी शिवभक्तहोय सदाचारानें शुद्ध अंतःकरण झाल्यावर त्याच्या ठिकाणी नम्र भाव येतो. अभंगातून पण "नम्र झाला सर्वाभूति । वाटे शिवाची विभूती" अशा भृत्याचारी व्यक्तिचा गौरव केला आहे.

३) विशेष आचार सांगताना माऊली वेगळ्या रितीने गणाचाराचे वर्णन करतात त्यांचे म्हणणे एक भाव आचार एक विचार आणि तोहि सर्व लोकांना भेदभाव रहित समान असा असावा. त्या विषयी सर्वाचि नैष्टिकी श्रद्धा असावी ते म्हणतात "यालागी पती पत्नी बंधुपुत्रा । एकचि गुरुदीक्षा सर्वत्रा" गृहीचे दासी सेवक पुत्रा । एकचि गुरु पाहिजे"। कारण सर्वांना " एक भाव विश्वास झालिया । मग सहज जाती मोक्षचिया ठाया। ते भिन्न भिन्न दिसती परिकाया । एकचि सर्व असे" । त्यामुळे एक भावे विशेष शुद्ध भक्ति । जया घडे एक चित्ती । तयासी मोक्ष पदाची प्राप्ति। घडे ऐक्य वो • देवी।" मोक्ष हा सहजच प्राप्त होऊ शकतो तसेच भ्रातृ भावाची वृद्धी होते.

४) लिंगच ज्याचे सर्वस्व आहे लिंगाशिवाय दुसरे कांही श्रेष्ठ वंद्य आहे असे ज्याला वाटतच नाही तो लिंगाचारी माऊलीच्या शब्दात लिंग हृदयीचे जीवन । लिंग प्राणाचा प्राण । लिंगामाजि निश्चित होऊन । असे जे का लिंगनिष्ठा परिपूर्ण। तो लिंगी असे लिंग होऊन । लिंग गेलिया प्राण । राहेकेवितयाचा।" आणि माऊलीच्या म्हणण्या प्रमाणे तो इतका दृढ आहे की, "लिंग बोलविल्या वेदुवाले । असे मानतो तो वीरशैव होय आणि तोच लिंगाचारी होतो. "

(५) वीरशैव लिंगनिष्ठ असला तर त्याची भावना सर्व विश्वशिवमय आहे अशी दृढ झाली पाहिजे. माऊलीच्या शब्दांत सांगावयाचे असल्यास ते परतत्व गुरुमुखे जाणोनि । मग तेचि असे

होऊनि । जागृती सुषुप्ती स्वप्नी । पालटू नाही जया ।"  "तो मनुष्य देही ही भावना। न भाऊन वस्तुत्वे भावी आपणा । तोचि जंगम श्रेष्ठ जाणा। शिवाचारासी गुरु होय"  तो साक्षात शिवरुप झालेला असतो त्याला सर्व शिवमय भासू लागते त्याचा भूमंडळावरील निवास केवळ भक्तोद्धारार्थच असतो या विषयी "  त्याचे इतकेचि अर्थ वर्म । अकर्ता केवळ परब्रह्म । सृष्टी विचरे भक्ताचे प्रेम । घ्यावयलागी। असे परमरहस्य ग्रंथात सांगितले आहे.    षटस्थला विषयी अत्यंत विस्तृत असे वर्णन केलेले आहे.  भक्त स्थलांतरर्गत आचार विचाराचे विवरण अत्यंत विस्तारपूर्वक दिले आहे भक्त स्थळ हे वीरशैव सिद्धांताप्रमाणे सर्व स्थलांला आधारभूत असे स्थळ आहे. अक्षरामध्ये अकारला,  संख्ये मध्ये पहिल्या अंकाला जितके महत्व आहे.  स्थला मध्ये भक्त

स्थळांना तितकेच महत्व आहे.  श्रवणापासून आत्म निवेदना पर्यंत भक्तीचा सगुणा पासून निर्गुणा पर्यंत उपासनेचा भक्त स्थलीय जीवच अधिकारी आहे.

१)  भक्ता विषयी माऊली म्हणतात म्हणोणि धन्य ते ६६  शिवभक्त । जे झाले गुरुकरजात । आणि भव संग न करित। शिवभक्त शुद्धते।"  आणि तसेच लिंगपूजा पद्धति देऊन,  ऐसी लिंगपूजा त्रिकाळ । जो करी सद्भावे होओनि निर्मळ । जाणावे शुद्ध भक्तिस्थळ । उत्तम साचे ते। अष्टावरणा विषयी ज्याची एकात्मबुद्धि आहे आणि गुरुलिंगजंगम यांचे विषयी एक मुर्तिः त्रिभाग झाली भक्तकाजे । म्हणोनि गुरुलिंगजंगम । तिन्ही एक मानुनि पूजी ओजे । तोचि भक्त उत्तम।"  तसेच "  जंगम लिंगी भेद धरिती । अधोगती पावे तत्वता। परमात्मभावे मानिता । पूजिता मोक्ष पदपावे।"  अशा प्रकारे भक्तस्थलांचे विवेचन  केले आहे.

२)  माऊली "आता माहेश्वर स्थळ तुज निरोपु निर्मळ । जे ऐकता पातक सकळ । जळोनिजाय।" अशा प्रकारे करतात.  तसेच "आता माहेश्वरस्थल महिमान । पार्वती एक विश्वासधरोन । तयासी । परस्त्री माते समान । काम नाही तयासी परस्त्री माते समान मानून पर द्रव्या विषयी पण तो । तया पर द्रव्य पाषाणासमान। पर निंदा हिंसा न करी आपण । इत्यादी व सर्व अवगुण । भाव शुद्ध

माहेश्वर तो।”  अगदी उदास असतो अहिंसा तर ती त्याची एकमेव निष्ठा असते.  तो कोणाचिही निंदा करीत नाही.  ज्याची भावना शुद्ध निर्मळ आहे तोच माहेश्वर होय.

३)  निष्ठावंत माहेश्वरच नित्यप्रसाद सेवी झाला म्हणजे त्याला प्रसादी म्हणता येईल. माऊलीच्या शब्दात त्याचे स्वरुप "ऐक तिसरे प्रसादी- स्थळ प्रसाद सेवेनी निष्ठा अढळ। नित्य प्रसादसेवी निर्मळ। भावे विश्वासे" असे आहे.  ते म्हणतात प्रसाद गोड कडुबहू थोडे जे म्हणतीते केवळ वेडे,  शिवगणी मिरवे कोण्या तोंडे। नित्य गोडी नेणे प्रसादानी।।'  प्रसाद म्हणजेच प्रसादतो पदार्थ नव्हे,  चवि पदार्थात पाहावी प्रसादात पाहता येत नाही.  जर तसे पाहत राहिलो तर आपण प्रसादी नसून पदार्थ भोगी आहोत.  भावी आहोत असेच सिद्ध होते म्हणून "प्रसादी विन्मूख न घडे कधि। प्रसाद लिंगार्पित करी आधि भावे सेविता प्रकाशे सद्बुद्धी। अष्टमासिद्धी ओळंगती अंगणी।"  प्रसादाचे सेवन करणे आवश्यक आहे त्याने बुद्धि निर्मळ होते आणि अशा भक्ताच्या चरणावर महासिद्धिलोळतात"  हे लटिके म्हणती तरि एक। अष्टमहासिद्धिचे काय कौतुक। श्वान मुखे वेद वदविला देख। मा अष्टमहासिद्धि किती।।"  इथे माऊलीला महात्मा बसवाने कुत्र्याचे तोंडून वेद वदविलेल्या कथेचे उदाहरण अभिप्रेत आहे. अर्थात् प्रसाद सिद्धि मुळे चित्तशुद्धि द्वारा सर्व सिद्धी मिळतात.

४)  प्राणलिंगी स्थलाविषयी माऊली कोण्याही प्रकारची भीड न ठेवता स्पष्टपणे म्हणतात, "अखंड त्याचा प्राण। लिंगी असे होओनि मग्न। यालागी प्राणलिंगी नामाभिधान। शोभे तयासी।"  तसेच तो "लिंग रुप होओनि असे। म्हणोनि तया सुख दुःख भयनसे। तो सुख दुःखा विरहित असे। निर्भय होओनिया"  प्रसादाने सत्व शुद्धि झाल्यामुळे त्याच्या ठिकाणी अभयत्व येते तो अत्यंत निर्भय झालेला असतो कारण माऊली म्हणतात,  "जो स्वयंचि रावो जाहला। तो काय भीयील सेवकाला। तैसा तो स्वयें लिंगी लिंग होओनि डेला। तया काळ यम कैचा।"  असा शिवयोगी शिवैक्य झाला तर त्याचे दहन करु नये,  कारण लिंगामध्येच तो ऐक्य झालेला असतो, त्या विषयी माऊली म्हणतात,  "म्हणोनि लिंगधारी दहन करणें गोत्रहत्या जाण। स्वयं

समाधिस्त म्हणोन । समाधीच करिती त्या ।" लिंगधारीची समाधीच केली पाहिजे दहन करता येत नाही नि दहन (जाळणे) नसल्यामुळे पिंडदानादि कर्मे श्रद्धादि कर्मे अवैध असल्यामुळे ती करु नयेत. केल्यास आरुढपतित पणाचा दोषमिळतात

५) शरण स्थलात माऊलीला सति पती भावाचा पूर्ण परिपाक दिसतो ते म्हणतात, "सत्ती पतीचीशरीरे वेगळी दिसती। परिआत्मत्वे एक होओनि वसती। तैसे लिंगी शरण स्थिती होओनि असे।" तसेच शरण नामाचे सार्थक्य "देखोनि या सत्य शरण। करी दंड प्रणाम शरण किंकर वृत्ती निराभिमान । म्हणोनि शरणस्थळ नाम हे।" तसेच "पाची इंद्रियाचे सुख अथवा दुःख । अणुमात्र नाही देख। लिंग सुख दायक होओनि असे अर्थात सर्व भोग लिंगार्पित असल्यामुळे सुखादि सर्व भोग लिंगाचेच असून आपणाकडे त्याचे भोक्तृत्व मुळी नाहीच ही धारणा बनलेली असते तो सामरस्याकडे पुर्ण पणे वळलेला असतो. त्याचे पाऊल ऐक्य स्थळाकडे वळलेले असते. तो जीव म्हणून मुळी उरलेलाच नसतो तो शरण होय.

६) ऐक्य स्थळाचे स्वरुप सांगताना जीव ऐक्य कसा होतो हे त्यांनी दृष्टांत देऊन "तो लिंगी मिळोन कैसा गेला। जैसा कापूर अनि रुपचि झाला । तैसा लिंगी मिळोन गेला। लिंग होओनि।" स्वतः विषयी ऐक्य स्थलीय साधकाची अवस्था पार विरोनि गेलेली असते. तो साधक राहत नाही आणि तो सिद्धहि नसतो साधना तर निमालेलीच असते. तो 44 भूता कृति भिन्न देखना। त्रिभूवनी देखे आप आपणा। विधी ऐक्य आपणा पाहे म्हणोनि ऐक्य स्थळ ।" तसेच तो निराश निःसंग। अनुपम्य अनुरागी अनंग। अनाम अप्रेमेय निजांग। होओनि असे सांगितले आहे. अष्टावरण पंचाचार आणि षट्स्थळी वीरशैवाची मूलभूत तत्वेच प्रामुख्याने प्रतिपादन केली आहेत. अशा प्रकारे श्रीपरमरहस्य हा ग्रंथ क्रियात्मक ज्ञान अथवा प्रायोगिक विज्ञानाचा भरपूर सागरच आहे. या विषयी श्री. यू.म. पठाण साहेबांनी विवेचन केले आहेच.

# प्रकरण चौथे
# कार्तिकी पोर्णिमा यात्रा

## प्रकरण चार

## कार्तिकी पोर्णिमा यात्रा

शिवयोगी संत मन्मथस्वामी महाराज यांच्या पावन स्पर्शाने पवित्र झालेल्या श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिकी पौर्णिमेच्या यात्रेला प्रारंभ होतो. 'मन्मथ माऊली, गुरुराज माऊली, गुरुराज माऊली, हर-हर महादेव' चा जयघोष श्रीक्षेत्र कपिलधार परिसरात यात्रेत कानी पडत होता. राज्यासह इतर राज्यातून याठिकाणी जवळजवळ ५० दिंड्या येतात. काही दिंड्यांचा प्रवास कित्येक मैलावरून सुरू असतो.



**कपिलधार येथील कार्तिकी पोर्णिमा यात्रा**

रिंगण सोहळा, सायंकाळी महापूजा, धर्मसभा, कीर्तन होतात. यात्रेनिमित्त लाखो भाविकांची मांदियाळी पहायला मिळते. या पार्श्वभूमीवर देवस्थान ट्रस्ट आणि प्रशासनाने चोख व्यवस्था करण्यात आली आहे.श्रीक्षेत्र कपिलधार येथे संतश्री मन्मथ स्वामींच्या संजीवन समाधीच्या दर्शनासाठी मागील तीन दिवसांपासूनच भाविकांची रेलचेल सुरु झाली. तर एक महिन्यापासून विविध राज्यातून दिंडी सोहळ्यास प्रारंभ होतो. यात्रा परिसरात विद्युत व्यवस्था बार्शी येथील ग्रुपकडून केली होती तर ट्रस्टचे तीन जनरेटर आहेत. महावितरणकडून यात्रा परिसरात ४ दिवस २४ तास विद्युत व्यस्था केली आहे. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचे पथक येथे सज्ज ठेवण्यात येते बीडमार्गे येणाऱ्या दिंड्यांचे बीड बायपास, मांजरसुंबा घाट कमान, पाली येथे स्वागत करण्यात येते. सहभागी भाविकांना अल्पाहार, चहा, पाण्याची

सोय विविध संघटना, वीरशैव समाजबांधवांकडून करण्यात येते. तर जागोजागी डस्टबिन ठेवण्यात आल्या येतात.४ यात्रा परिसरातील खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या दुकानांना भेटी देऊन संबंधित विक्रेत्यांना स्वच्छता राखण्याच्या व दक्षतेच्या सूचना अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी देत असतात. मंदिर परिसरात प्रसाद आणि खाद्यपदार्थांची दुकाने थाटली आहेत. १० हजार भाविकांची सोय यात्रेनिमित्त जवळपास दहा हजार भाविकांची निवास व्यवस्था करण्यात आली असून याशिवाय देवस्थानच्या शेतजमीन परिसरातही सुविधा करण्यात आली आहे.अन्नदानाचा महायज्ञ यात्रेनिमित्त नांदेड येथील सारथी संघटनेच्या वतीने ३ दिवस २४ तास अन्नदान सेवा दिली जाते. खिचडी आणि बुंदीचा महाप्रसाद भाविकांना वाटप केला जातो. २२ आचारी व संघटनेचे स्वयंसेवक असे १०० जण एक ट्रक बासमती तांदूळ व एक ट्रक साखरेसह येते. महाप्रसाद महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. .सीसीटीव्ही कॅमेरे परिसरात कार्यान्वित आहेत.शिवाचार्यांचीविशेष व्यवस्था श्रीक्षेत्र कपिलधार येथे ५० हून अधिक शिवाचार्य येत आहेत. त्यांची विशेष स्वतंत्र व्यवस्था देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

**यात्रेला सुरुवात :**

या यात्रेला सुरुवात वेगवेगळ्या ठिकाणावरून होत असते, वेगवेगळया खेड्यांमधून शहरांमधून भाविक भक्तांची दिंडी निघत असते. वेगवेगळया ग्रामीण भागातून कार्तिक पौर्णिमेच्या आठ ते नऊ दिवसा अगोदर पासून वेगवेगळया ठिकाणाहून ही दिंडी निघत असते सुरुवातीचा मुक्काम हा त्यांच्या जवळच्या एकाद्या मंदिरामध्ये किंवा आश्रमामध्ये केलेला असतो. गुरुराज माऊली! मन्मथ माऊली! या गजराने, वेगवेगळया अभंगांनी, ओव्यांनी, आरती, शिवपाठ अशा वेगवेगळया संगीतमय वातावरणाने या दिंडीची वाटचाल पुढे होत असते. दिवसभर प्रवास करून वेगवेगळया कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन टाळ, विना, मृदंग, भक्तीगीते, अभंगगीते गाऊन भक्तीचा वातावरणाने भक्तीमय मनाने भक्त मंडळी दररोज कित्येक किलोमीटर चालत असतात. संध्याकाळच्या वेळेस या सर्वांचा मुक्काम एखाद्या ठिकाणी ठरलेला

असतो. या थांबलेल्या ठिकाणी सुध्दा वेगवेगळे उपक्रम घेतले जातात. पाऊले खेळणे, फुगडी खेळणे, रिंगण सोहळा (सावरगाव लोखंडी खडीकेंद्र य ठिकाणी) अश्या मनोरंजनात्मक आयोजनांनी भक्तजनांची रात्र बहरून जाते. या भाविक भक्तांना अन्नाच्या नाश्त्याच्या व्यवस्था स्थानिक लोकांकडून केल्याचे पाहायला मिळते. त्यामध्ये नाष्टा, फळे, जेवण यासागल्यांचा समावेश असतो, यापाठीमागे दानधर्म करण्याचे समाधान आणि देवाचे कार्य ही पवित्र भूमिका स्थानिकांच्या मनात रुजल्याची दिसून येते.

पाण्याचा ओढा ज्याप्रमाणे पुढे जात-जात एका ठिकाणी येत असतो आणि त्याची तीव्रता वाढत जाते त्याचप्रमाणे कपिलाधार क्षेत्रापासून जवळ येत असताना भाविकांची गर्दी ही वाढलेली दिसते, वेगवेगळया क्षेत्रातून लोक एका ठिकाणी येत असतात. लाखो लोकांची रांग कित्येक किलोमीटर पर्यंत असल्याची दिसून येत, हजारो गाड्या रस्त्याने चाल्याचे दिसून येते. महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातून मोठ्या प्रमाणत पर्यटकांची सुद्धा गर्दी येथे पाहायला मिळते. आठ ते नऊ दिवसांचा प्रवास करून ही पायी चालत जाणारी यात्रा कार्तिकी पौर्णिमेच्या दिवशी कपिलाधार या ठिकाणी पोहचते, कदाचित म्हणूनच हीचे नाव 'कार्तिकी पौर्णिमा यात्रा' पडले असावे! हिवाळयाच्या या दिवसांमध्ये कडाक्याची थंडी पडलेली असते अशा खडकाच्या थंडीतही भाविकांची गर्दी पाहून मन भारावून जाते. सुरुवातीला एक सुंदर निसर्गमय नागमोडी वळण चालून मंदिरात जाता येते अत्यंत खोल दर्या आजूबाजूला पाहायला मिळतात त्याचबरोबर उंच उंच डोंगरांनी चारही बाजूने हे क्षेत्र वेढलेले पाहायला मिळते. या यात्रेमध्ये वेगवेगळया प्रकारची वस्तू विक्रीस आणल्या जातात. यामध्ये विभूती, शंख, वेगवेगळया फोटो, खाण्याचे सामान, प्रसादाचे सामान, मिठाई, वादन साहित्य, खेळण्या, वेगळी पुस्तके पाहायला मिळतात.





संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराजांचे समाधी मंदिर, कपिलधार



कपिलधार येथील निसर्गरम्य धबधबा

या ठिकाणच्या प्रमुख आकर्षण असलेल्या धबधब्याच्या ठिकाणी यात्रेच्या दिवसात खूपच गर्दी असते बऱ्याच उंचावून पडणारे पाणी आणि पाण्याचा खडखड आवाज हा हा पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे. या ठिकाणी स्नान केल्यानंतर भक्तजनांचे सर्व दुःख नष्ट होते असा अनेकांचा विश्वास आहे म्हणून तितक्या खडकाच्या थंडीतही सर्व भक्तजन या पाण्याच्या आधारे खाली स्नान करतात. वेगवेगळया प्रकारच्या डोंगरातून आणि पठाराहून पाऊस पडून कोड्यांच्या माध्यमातून पुढे एकत्र येत याला एका मोठ्या ओढ्याचे स्वरूप प्राप्त होते आणि पुढे हा ओढा या दरीत वसलेल्या मंदिराच्या समोरच्या बाजूस येऊन पडतो आणि इथेच त्याला कपिलाधार धबधब्याचे स्वरूप प्राप्त होते. असा हा भव्य धबधबा इथले प्रमुख आकर्षण आहे.



**प्रमुख धबधबा**

## डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज

शिवलिंग शिवाचार्य महाराज लिंगायत धर्माचे आद्य प्रवर्तक गुरु होते. त्यांना या यात्रेमध्ये अनन्यसाधारण महत्व होते लिंगायत धर्माच्या उद्धारासाठी त्यांनी आयुष्यभर कष्ट घेतले, वेगवेगळया प्रकारचे ट्रस्ट स्थापन केले, कपिलाधार या ठिकाणी भक्तांसाठी मोठी इमारत बांधली. महाराज हे अत्यंत उतार वयातही सात ते दहा दिवस पाणी कपिलाधार चालत येत होते, या वयातही घोड्यावर बसणे, पाऊले खेळणे, प्रवचन देणे ही अशी अविश्वसनीय करते माऊली करत होती. शिवलिंग शिवाचार्य महाराज कपिलाधार येथे यात्रेत असताना एका विशिष्ट सोहळयामध्ये त्यांच्यावर पडणाऱ्या हेलिकॉप्टर वरून पडणाऱ्या फुलांचा वर्षाव पाहण्यासाठी भक्तांची विशेष गर्दी असं. सध्या शिवलिंग शिवाचार्य महाराज आपल्यात नाही येत त्यांच्यामुळे वीरशैव धर्माचे मोठे नुकसान झाले आहे त्याचबरोबर या कार्तिकी पौर्णिमा यात्रेचा मुकुटमणी हरवल्यासारखा आहे.

# प्रकरण पाचवे
# उपसंहार

## प्रकरण पाचवे

## उपसंहार

वैष्णव संप्रदायाच्या साहित्याला तितक्या प्रसिद्धीची गरज नाही, कारण श्री संत ज्ञानेश्वर संत तुकाराम एकनाथ संत रामदास यांच्या लेखनाने या या साहित्याला बरीच मान्यता मिळाली आहे. महाभारत रामायण यासारख्या सुप्रसिद्ध ग्रंथांमुळे वैष्णव पंथाचे साहित्य आजही लोकांच्या स्मरणात आहे आहे परंतु शिवपंथाच्या साहित्याच्या प्रकाशनात कुठेतरी मर्यादा आलेली दिसते. शिवपंथातील अप्रतिम साहित्याला प्रकाशात आणण्याची गरज आहे.सतराव्या शतकात जन्मलेल्या मन्मथ स्वामी सर्व मायेचा त्याग करून भक्तिमार्गाकडे त्यांनी प्रयाण केले. आणि या साहित्याला प्रकाशात आणण्यामध्ये मन्मथ स्वामी यांच्या साहित्याचे मोलाचे योगदान आहे. त्याचबरोबर मन्मथ स्वामी हे व्यक्तिमत्त्वही स्वतः प्रेरणादायी आहे.

सध्याचे युग हे आधुनिक आहे, मानवाचे जीवन धावपळीचे झाले आहे. या धावपळीच्या जीवनातही पुन्हा एकदा नीतिमत्तेच्या मार्गाला जायचे असेल तर मानवाला आपल्या भूतकालीन संस्कृतीमध्ये डोकावून पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. आणि त्यांचा एक उत्तम प्रभावी मार्ग म्हणजे त्या काळच्या साहित्याद्वारे आपल्याला मिळू शकतो. आणि त्यातल्या त्यात मन्मथ स्वामींचे साहित्य तर मोत्याच्या मुकुटासारखेच आहे.

बीड जिल्ह्यातील कपीलधार अत्यंत महत्त्वाचे तीर्थक्षेत्र. वीरशैवांचे श्रद्धास्थान. निसर्गरम्य ठिकाण. पर्यटनासाठी आकर्षणच. घनदाट अरण्य. गर्द झाडी. आकाशाला गवसणी घालणारे डोंगर. तितक्याच खोलद-या. साध्या, सरळ आणि सोप्या भाषेत प्राग्वेदांचे जीवनावश्यक ज्ञान देण्याचा संकल्प पार पाडण्यासाठी आत्म, विश्वकल्याणाचे शिव तत्त्वज्ञान सकल प्राणीमात्रांना देण्याऱ्या संत शिरोमणी मन्मथ स्वामींच्या संकल्पपूर्तीचे ठिकाणही कपीलधारच. भक्तीभावाने भाविक कार्तिक पोर्णिमेला इथे पायी येतात. मन्मथ स्वामींच्या संजीवन समाधीचे दर्शन घेऊन तृप्त होतात. मन्मथ स्वामी वीरशैवांचे चैतन्यच. मराठी वीरशैव

संत साहित्याचे जनक मन्मथ स्वामींनी धार्मिक, सामाजिक, राजकीय गुलामगिरीत खितपत पडलेल्या वीरशैवांना अस्तित्त्व मिळवून दिले. संस्कृतमधील पुरातन व गुढ तत्त्वज्ञानाचे निरूपण प्राकृत भाषेत म्हणजे मायबोली मराठीत व्हावे. विश्वकल्याणाचा विचार लोकांना त्यांच्या भाषेत समाजावा या उदात्त हेतूने कपीलधार येथे स्वामींनी प्राग्वेदांचे ज्ञान मानवांना दिले. वीरशैवांसाठी तो काळ सुवर्णयुगच. शिवयोग साधना, साहित्य रचनेचा काळ स्वामींनी कपीलधार इथे व्यतीत केला. 'परमरहस्य' ग्रंथांची निर्मिती केली. संसार, परमार्थ यशस्वीपणे पार पाडण्याचा गुरूमंत्र म्हणजेच 'परमरहस्य'.

मानव संस्कृतीचा उद्गम, विकास, ज्ञान, विज्ञान आणि तत्त्वज्ञानाचा आंतर्भाव 'परमरहस्य' मध्ये आहे. सुसंस्कृत, विकसीत, विज्ञाननिष्ठ मानवी जीवन पद्धतीचे दर्शन स्वामींनी यामध्ये केल्याचे आढळते. षटस्थल, अष्टवर्ण, पंचाचार, षटचर्क, पंचाक्षरी मंत्र, संस्कार, पंचपीठ, परंपरेचे वर्णनही स्वामींनी केले आहे. वीरशैवांच्या संत साहित्यात प्रचंड वाढ त्यांनी केली. ग्रंथ मानवाला घडवतात. साहित्यातून अमृत चाखता येतं. म्हणून ग्रंथ, संत साहित्याबरोबरच विपुल प्रमाणात अभंगांची निर्मितीही केली. शिव कीर्तन, भजन परंपरेला पुनर्जीवित करण्याचे महत्त्वाचे कार्य स्वामींनी केले.

ग्रंथ, अभंग, कीर्तन आणि भजन परंपरेने वीरशैव समाजात जागृती घडविण्याचे कार्य त्यांनी केले. त्यातून वीरशैवांच्या जीवनाचा उद्धार झाला. असंख्य जणांच्या जीवनाला अर्थ प्राप्त झाला. मोक्ष प्राप्तीचा मार्ग सुकर झाला. सनातनांच्या धार्मिक शोषणातून मुक्ती मिळाली. धर्मांधाच्या अत्याचाराला समर्थपणे सामोरे जाण्याची ताकत बहुजनांना स्वामींमुळे आली. माणसाला माणूस बनविण्याचे कार्य स्वामींनी केले. सातत्याने मानव, विश्व कल्याणाचा ध्यास त्यांनी घेतला. शिवभक्तीची शिवगंगा, शिवसंस्कृतीची भागिरथी दुथडी भरून वाहते ती केवळ आणि केवळ स्वामींमुळेच.

आई-वडिलांची शिकवण, जन्मत:च विरक्त वृत्ती, त्यागी, तपस्वी जीवनापुढे जगत् कल्याण, धर्म जागृती, विश्वकल्याणाची तळमळ, लौकिक व परलौकिक हिताचे ज्ञान

जगाला देणा–या मन्मथ स्वामींच्या संजीवन समाधीच्या दर्शनासाठी राज्याबरोबरच बाजूच्या कर्नाटकातूनही भाविक कपीलधारला येतात. स्वामींनी दाखविलेल्या मार्गावर चालण्याचा संकल्प करतात. विश्वकल्याणाचा प्रसार करतात. दरवर्षी हा सोहळा डोळ्यांचे पारणे फेडणारा असाच आहे. कार्तिक पोर्णिमेस मन्मथ स्वामींचा साक्षात्कार दिन म्हणून साजरा होतो. या दिवशी देशातील भाविक मन्मथ स्वामींच्या समाधी दर्शनासाठी येतात. त्यातून नवचैतन्याची भरारी घेऊन पुढील वर्षभरासाठी उत्साहित होतात. मानव कल्याणाचा ध्यास घेऊन कार्य करतात.

अशा या व्यक्तिमत्वची ओळख समस्त मानव जातीला झालीच पाहिजे जेणेकरून विश्वसुखाची त्यांची संकल्पना प्रत्यक्षात साकार करून भूलोकावर सदाचार वाढवा सद्वितेचा भडिमार होऊन सर्वत्र विश्वशांती नांदावी.

# संदर्भ सूची

# संदर्भ सूची


१. परमरहस्य, संपादक राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य, संस्कृती प्रकाशन, अहमदपूर

२. गुरुदेव, सौ. रजनीताई सूर्यकांतअप्पा मंगलगे, संस्कृती प्रकाशन अहमदपूर

३. कोटावळे, कुमार, मन्मथस्वामी चरित्र, वाङ्मय व कार्यग्रंथ, क्षेत्र कपिलधार, १९७३.

४. मराठवाड्यातील वीरशैव संत साहित्य: एक विवेचक अभ्यास, संशोधक माधव दत्तात्रेय मोरे शोध प्रबंध

५. हैबतपूरे शिवानंद, योगी पावन मनाचा श्री संत शिरोमणी मन्मथस्वामी चरित्र

६. मराठी विश्वकोश https://vishwakosh.marathi.gov.in/28411/

७. https://www.lokmat.com/ November 22, 2018 12:31 AM

८. https://youtu.be/WB-8qXnkkzU लिंगायत धर्म यूट्यूब चॅनल